भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

GM 056527

करार

तारीख- 7/2/2013 रजि.नं.- 9322

नांव- उपसचिव सचिव अधिकारी

राहणार- अहमदनगर

हस्ते- कोतवाल फ्रान्सीस पारोवे रा पारोली

जिल्हा कोषागार कार्यालय अहमदनगर प. दिनांक - 8 FEB 2013

अहमदनगर

Seen by

Seelibak.

## सामंजस्य करार

*(100 रुपयाच्या स्टँपपेपरवर)*

**लिहून देणार: मा. संचालक, B.P.H.E.S Society संचलित CSRD Ahmednagar, Station Road, Near Nagar Aurangabad Highway.**

**लिहून घेणार :- मा. निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) राजभवन कॉम्पलेक्स, बाणेर रोड, पुणे- ७**

केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) अंतर्गत सन २०१०-२०११ या कालावधीत महाराष्ट्रातील मंजुर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ लागू करण्यात आलेल्या असून यातील तरतुदींप्रमाणे राज्य शासनांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

Dr. Suresh Pathare
Director
BPHES-CSRD
Institute of Social Work & Research
Station Road, Ahmednagar-414001

त्यानुसार महाराष्ट्र शासनाने वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा (VSLNA) गठण करून संस्था अधिनियम कायदा १८६० नुसार नोंदणी केली आहे. IWMP प्रकल्पांच्या क्षमता बांधणी व प्रशिक्षणांसाठी वसुंधरा यंत्रणेने यशदा, पुणे या संस्थेची शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून निवड केली आहे.

यशदा, पुणे (लिहून घेणार) या संस्थेने B.P.H.E.S Society संचलित CSRD Ahmednagar या संस्थेची अहमदनगर या जिल्हा प्रकल्पांतर्गत प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) म्हणून निवड केली आहे. त्यानूसार संस्थेने यशदा, पुणे यांनी निश्चित केलेल्या क्षमता बांधणी कार्यक्रमानूसार प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) अंतर्गत सन २०१०-२०११ मंजुर प्रकल्पांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनासाठी खालील अटी व शर्तींच्या आधीन राहून दिनांक १५/२/२०१३ रोजी सामंजस्य करार करण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती:-</u>

१. निश्चित केलेल्या जिल्ह्यात/विभागात यशदा, पुणे संस्थेने ठरवून दिलेल्या एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे काम ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करावे.

२. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने वाचन साहित्याचे वाटप करणे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे संभाव्य वेळापत्रक तयार करणे, प्रशिक्षण कार्यक्रमाचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे इत्यादी कामे करुन यशदा, पुणे यांचे संमतीने व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) यांचे समन्वयाने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३. प्रशिक्षणासाठी, प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस याप्रमाणे रुपये ५५०/- परिचय प्रशिक्षणासाठी व रू. २५० प्रशिक्षण सहलीसाठी तसेच जाणीवजागृती मेळाव्यासाठी प्रति कार्यक्रम रू. १०,००० यप्रमाणे निधी यशदा, पुणे यांचेकडून वितरीत केला जाईल. या निधीतून प्रशिक्षणासाठी आवश्यक खर्च सोबतच्या प्रपत्रात ठरवून दिलेल्या बाबीनूसार करण्यात यावा. प्रशिक्षण कार्यक्रमातील एकूण प्रशिक्षणार्थी संख्येनूसार २५ टक्के रक्कम अग्रिम म्हणून वितरीत करण्यात येईल.

४. प्रशिक्षणासाठी वितरीत केलेल्या निधींचे उपयोगिता प्रमाणपत्र, बाबनिहाय खर्चाचे तपशिल आणि प्रशिक्षणा संबंधीचे अहवाल जसे की, प्रशिक्षणार्थी यादी, मूल्यमापन अहवाल इत्यादी यशदा, पुणे यांना प्राप्त झाल्यानंतर पुढील हप्त्याचे वितरण करण्यात येईल.

५. प्रशिक्षणासाठी दृकश्राव्य माध्यम, चित्रफिती, इत्यादींचा वापर करुन प्रशिक्षण कार्यक्रम अधिकाधिक परिणामकारक व गुणवत्तापूर्वक होतील याकडे विशेषत्वाने लक्ष देणे बंधनकारक आहे.

६ एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थी स्वयंसहाय्यता गट, (SHG) उपभोक्ता गट, (UG) समुदाय (Community) संबंधीत प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा किंवा जिल्हा पाणलोट विकास युनिट चे सचिव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून सतत अदयावत ठेवावे.

Dr. Suresh Pathare
Director
BPHES-CSRD
Institute of Social Work & Research
Station Road, Ahmednagar-414001

७. प्रशिक्षणा संबंधी यशदा, पुणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा पाणलोट विकास युनिट व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा सचिव आणि प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांचेशी समन्वय ठेवून प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करावेत.

८. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजना मध्ये कोणतेही गैर प्रकार होणार नाहीत याची संस्थेने खबरदारी घ्यावयाची आहे. गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्यास संबंधीत संस्थेचे काम काढून घेण्याचा किंवा संस्थेबरोबरचा करार रद्द करण्याचा अधिकार यशदाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे राहील. याबाबतचा अंतिम निर्णय यशदाचा राहील.

९. सनियंत्रण, मूल्यमापन आणि लेखापरिक्षण इत्यादी कामासाठी यशदा, पुणे आणि त्यांचे प्रतिनिधींना वेळोवेळी आवश्यक ते अभिलेख आणि प्रशिक्षणासंबंधी कागदपत्रे उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

१०. शासकीय अथवा इतर निधीतून आजतागायत राबविलेल्या कोणत्याही प्रकल्पात आमच्या संस्थेकडून गैरव्यवहार अथवा गैरप्रकार झालेला नसल्याने आमची संस्था कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय यंत्रणेने काळया यादीत टाकलेली नाही.

- संस्थेचे नाव व शिक्का- B.P.H.E.S Society संचलित CSRD Ahmednagar.
- संस्थेचे प्रतिनिधींचे नाव---- Dr. Suresh Pathare
- हुद्दा---- Director

BPHES-CSRD
Institute of Social Work & Research
Station Road, Ahmednagar-414001

- साक्षीदार ---
  १.
  २.